Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- X | ISSUE- VII | JULY | 2023 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.367 | ISSN 2349-638x

# दामोदर पंडितांच्या वच्छाहरणातील काव्यसौंदर्य

**डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे**
मराठी विभाग,
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव ता.चाकूर जि.लातूर

दामोदर पंडित यांची कवितेविषयी जी कल्पना आहे ती समजावून घेणे अगत्याचे आहे. दामोदर पंडित हे नावाप्रमाणेच पंडित होते. संस्कृत व मराठी या दोन्ही भाषांवर त्याचे प्रभुत्व होते. काव्यातील अलंकार, पदबध्द रचना, रस इ. ची दामोदर पंडितांना चांगली माहिती होती. हे वच्छाहरणातील प्रास्ताविक ओव्यावरून लक्षात येते. उदा- उपमा, श्लेष, वर्णक I उपमा - श्लोक - वर्णक I एहिक रंजौ सकले लोक I कि पवाडे संसार मोचक I वानू मुकुंदाचे ।।' यावरून कवीला उपमा, श्लेष इत्यादी अलंकराची माहिती आहे. हे सिद्ध होते; पण अशा अलंकार निर्मितीने सर्वसामान्य लोकांचे मनोरंजन करावे हे कवीला आवडत नाही, तर श्रीकृष्णाचे गुणानूवाद घडावे यातच कवीला रस आहे. कारण श्रीकृष्णाची कथा संसार सागरातून तारुण नेणारी आहे. म्हणून कवीला इतर रसांमध्ये रस नाही. तर श्रीकृष्ण कथा वर्णनात कवीला रस आहे. कवीने रस आणि अलंकार यांची निर्मिती केलीच नाही. असे नाही, तर कवीने श्रीकृष्णाला नऊ रसाचे भांडार म्हटले आहे. श्रीकृष्ण कथेत हे नऊ रस कसे सामावलेले आहेत. हे दामोदर पंडितांनी दाखवून दिले आहे. ते लिहितात, "श्रीकृष्णाने रास क्रिडा केली आणि मुर्तीमंत 'शृंगाररस' निर्माण झाला. कृष्णाने गोकुळातील गवळणीशी थट्टा केली 'आणि त्यातून 'हास्यरस' निर्माण झाला. यशोदेला कृष्णाने भिती दाखवली आणि त्यातून 'करुणरस' निर्माण झाला. यशोदेला कृष्णाने आपल्या तोडांत विश्वरूप दाखविले आणि 'अदभुतरस' निर्माण झाला. कालिया या विषारी सापाला कृष्णाने पिंजून - पिंजून मारले आणि त्यातून 'रौद्ररस' निर्माण झाला. तोंडातील विश्वरुपात कृष्णाने यशोदेस अनेक भयानक दृष्य दाखवले त्यातून 'भयानकरस' निर्माण झाला. कृष्णाने दैत्यांचा संहार केला त्या प्रसंगातून "विररस' व 'बिभत्सरस' निर्माण झाला. तसेच 'शांतरस' हा तर श्रीकृष्ण कथेतून नेहमीचाच आहे. अशा तहने कृष्णाने जगाला मोहीत करणारे 'नवरसनाटक' निर्माण केले; परंतु त्याचे खरे स्वरूप ब्रम्हदेवालाही कळले नाही. अशा तऱ्हेने दामोदर पंडितांनी श्रीकृष्ण कथेतील नऊ रस उलगडून दाखवले. या वर्णनात त्यांची कल्पकता दिसून येते. अशा रीतिने कवीला कृष्णकथेत रस आहे आणि त्याच रसाची निर्मिती करण्यात आपल्या, वाणीची सफलता आहे. असे कवीला वाटते. सर्व संताना आवडणारी ही कृष्णकथा दामोदर पंडिताना गाण्यात खरा आनंद वाटतो. म्हणून विविध रसाची व काव्यगुणांची पर्वा न करता कवीने श्रीकृष्ण भक्तिला आपल्या काव्यात महत्वाचे स्थान दिले. कवी लिहितो, "नागरी बोली स्थल वानीजे सकल रसते I पोखिजे की निरसा होऊनि श्रीकृष्णी भजिजे I एया दो कवण चांग" ।।१६।।असा प्रश्न कवीने उपस्थित केला आहे. सुसंस्कृत कथा प्रसंगाचे वर्णन करून सर्व रसाचे पोषण करावे की, रसांची पर्वा न करता श्रीकृष्णाची सेवा करावी? किंवा भजन करावे'? या दोन्हीत कोणते चांगले आहे? असा प्रश्न कवी निर्माण करतो आणि त्यांतील दुसरा पर्याय कवी निवडतो. कारण भगवद् भक्ती भजणारी काव्यरचना कितीही सुंदर व लालित्यपूर्ण 'असली, तरी ती दामोदर पंडिताना त्याज्य वाटते. यातच दामोदर पंडिताच्या काव्याचे वैशिष्टय सामावले आहे. दामोदर पंडितांची आपल्या पंथावर कठोर निष्ठा आहे. त्या निष्ठेमुळेच त्यांनी इतर गोष्टीपेक्षा श्रीकृष्ण कथेला आपली वाणी समर्पीत केली आहे. म्हणून वच्छाहरण या काव्यात आख्यानाचा प्रवाह फ़ारसा खंडित न करता किंवा अलंकाराचा फारसा अट्टाहास न करता कवीने ही कथा वर्णन केलेली आहे. कवीने रस व अलंकार त्याज्य मानले असले, तरी वछाहरण काव्यात दामोदर पंडिताने काव्यगुणांचा पुरेपुर उपयोग केला आहे. उदा. मूळ भागवतात श्रीकृष्णाने यमुनेच्या काठी येऊन सरोवर पाहिले, तर त्यास सर्व यमुना नदी आणि तिचा परिसर अतिशय सुंदर दिसू लागला. असे वर्णन मूळ भागवतात फक्त देन श्लोकात केले आहे; पण कवीने वृंदावनाचे वर्णन जवळपास 45. ओव्यात केले आहे. हा विस्तार केवळ

भक्तिरसाची निर्मिती करण्यासाठी कवीने केला आहे. उदा. अधासूराचा वध केल्यानंतर सर्व देवांनी कृष्णाचा जयजयकार केला. त्यानंतर कृष्ण वृंदावनात आला आणि त्याने अतिशय प्रेमाने वृंदावनातील झाडे, लता, वेली, सरोवरे याकडे पाहिले आणि कृष्णाची दृष्टी पडताच सर्व परिसर पवित्र झाला. खरे म्हणजे जेथे सर्वेश्वर कृष्ण क्रिडा करतो त्या वृंदावनाची महती गाणे कवीला शक्य वाटत नाही. कारण वृंदावनातील झाडे, पक्षी याचे अस्तित्वच अतिशय मोहक बनले होते. खरोखरच कृष्ण ज्याच्या सहवासात असतो की, त्यामुळे ती झाडे धन्य होत. ज्या झाडांनी पिडित जिवांना आपल्या फळांनी, फुलांनी, सावलीने तृप्त केले. ते सारे धन्य होत. वृंदावनातील झाडे फळांनी, फुलांनी वाकली होती. जणू काही श्रीकृष्णाची चरण सेवा करण्यासाठी ते सारे नम्र झाली आहेत. असे वृंदावनातील मुनीजनांना वाटत असे अशी उत्प्रेक्षा दामोदर पंडितांनी येथे केली आहे. श्रीकृष्णाला पाहिल्यावर वृदांवनातील वृक्षांना इतका आनंद झाला की, ती झाडे फळाफुलांनी समृद्ध झाली. इतकेच नव्हे, तर त्या फळा-फुलातून जो रस गळत होता तो रस पृथ्वीतून पाताळात पाझरू लागला आणि पाताळातून अमृताच्या "साठयात भर पडू लागली. अशी अतिशोयक्ती अलंकाराची रचना कवीने साधली आहे. वृंदावनाचे सर्व दृश्य इतके मोहक होते की, एक प्रकारची निळी क्रांती सर्व आकाशभर प्रतिबिंबित झाली होती आणि आकाशातील तारे जे वृंदावनातील वृक्षावरील फुलांची प्रतिबिंबंच आहेत की, काय असे वाटत होते. अशी सुंदर उपमा कवीने साधली आहे. कवीच्या कल्पनाशक्तिचे हे एक सुंदर स्थळ आहे. वृंदावनात नारंगी, साकरलिंबू, फणस, मधुकाकडी अशी रसाळ फळांची झाडे होती. तसेच द्राक्षांचे दाट मंडप होते. पिकलेली डाळींबे, फणस याची दाट झाडी होती. चाफा पारिजातक, अशोका आणि आंबा यांची लक्षावधी झाडे होती. चंदन, कल्पवृक्ष यांच्या दाट झाडीत श्रीकृष्ण गोपाळाबरोबर खेळत होता. त्या वृक्षांच्या जवळ, चंद्राकार सरोवरे होती. त्या सरोवराचे पाणी अमृताप्रमाणे गोड होती. त्या सरोवरात अनेक जलदेवता क्रिडा करीत होत्या. त्या सरोवरांचे पाणी पिऊन सर्व प्राणी मात्र आपापला वैरभाव विसरून गेले. हत्ती आणि सिंह, वाघ आणि हरिण हे एकाच ठिकाणी रवंथ करीत होते. या सरोवरात सुवर्ण कमळे विकसीत झाली आणि थवेच्या थवे त्या कमलावर, झेपावत होते त्याच ठिकाणी राजहंस कमलकंदाचा चारा एकमेकात वाटत होते. त्या सरोवराच्या काठी स्फटिकाच्या शिळा होत्या आणि त्या शिळावर अनेक विद्याधारी कृष्णाची प्राप्ती व्हावी म्हणून पूजा करीत होते. अनेक ऋषी, मुनी त्या ठिकाणी ज्ञान, योग, ध्यान यांची उपासना करीत होते. ज्याप्रमाणे एखादी कामिनी प्रियकाराला अलिंगन देते. त्याप्रमाणे मंदारवृक्षाला अनेक कल्पलता बिलगल्या होत्या. त्या वेलीला रसाळ फळे लगडली होती. वृंदावनात फुलांचीही वृक्ष होते. त्याचा सुवास चार कोसापर्यंत जात असे. अनेक ठिकाणी भुंग्याना उत्तेजित करणारे बकुळ वृक्ष होते. तसेच सोनकेवडयाचेही वृक्ष होते. त्या वृंदावनात कापूर केळीच्या रांगा होत्या. तेथे श्रीकृष्ण क्षणभर उभा राहिला. कांही ठिकाणी लाल रंगाची फूले होती आणि त्यातील मकरंदाचे सेवन करण्यासाठी कांही ऋषी मुनींनी भुंग्याचे रूप धारण केले होते. असे वर्णन करताना कवीने जेथे सुंदर श्लेष, साधला आहे. जेथे "सानुरागे सुमनसे । मकरंद अस्वादनमीसे। ( लाल रंगाची भक्तीभावाने युक्त ) श्रीकृष्ण पावेया दोसे ।मुनी खडपद झाले ।।" ( फुले, शुद्ध अंत:करण) वरील कवितेतून कवीने सानुराग आणि सुमन या दोन शब्दांची श्लेषार्थी रचना करून सौंदर्य निर्माण केले आहे. वृंदावनातील भ्रमर मकरंदाचे सेवन करून गुंजाग्र करीत होते. जणू काही भुग्यांचा गुंजाग्र कृष्णाच्या मुरलीतील सुराप्रमाणे वाटत होता. तर वृंदावनातील अनेक पक्षी 'पंचम स्वरात' गाऊन आपल्या प्रेयसीला साद घालत होते. श्रीकृष्णाची मेघाप्रमाणे सावळी मुर्ती पाहून मोर आनंदाने नृत्य करीत होते आणि वृंदावनातील पोपट आणि मैना वेदांतील सिद्धांताची परस्परात चर्चा करीत होती. त्या वृंदावनाच्या आकर्षणाने स्वर्गातील देवाच्या स्त्रियाही तेथे येऊन गायन करित होत्या आणि श्रीकृष्णाला पाहताच त्यांचे मन स्थिर झाले होते. वृंदावनात वसंत सर्व ऋतुला घेऊन उपस्थित झाल्यामुळे सर्व वनदेवता आनंदाने नाचत होत्या. असे हे वृंदावनाचे वर्णन अतिशय आकर्षक कल्पनाने कवीने केले आहे. श्रीकृष्णाच्या सान्नीध्यामुळे वृंदावनातील निसर्गाचे रंग किती अद्भुत व रमणीय वाटत होते हे कवीने चित्रित करून या काव्याच्या सौंदर्यात भर घातली आहे. मूळ भागवतात कृष्ण यमुनेच्या काठी आला आणि त्याने आपल्या सर्व मित्रांना यमुनेचे वाळवंट दाखवले. असे एका श्लोकाचेच वर्णन भागवतात आले आहे; पण दामोदर पंडितांनी या एकाच श्लोकावर यमुना वर्णनाचा बहारदार प्रसंग रंगविला आहे. श्रीकृष्णाने यमुनेच्या काठी अनेक क्रिडा केल्या त्या यमुनेला कालिंदी

असेही म्हटले आहे. कालिंदीचे पाणी मुळात स्वच्छ व शुभ्र होते; परंतु तिच्यात श्रीकृष्णांच्या सावळ्या रंगाचे प्रतिबिंब पडताच ही दाट निळसर बनली. देवाचे सानिध्य जड पदार्थालाही कशा प्रकारे संपन्नता देत असते. साजूप्यता देत असते. हे यमुनेच्या निळया रंगावरून दिसून येते. श्रीकृष्णाला पाहिल्यानंतर यमुना नदी वेडी झाली. आनंदाने तिच्या अंगावर रोमांच दाटून आले. म्हणजेच तिच्यावर तरंग निर्माण झाले. कवीने यमुनेचे येथे तरंगीणी असे सुंदर शब्दात वर्णन केले आहे. श्रीकृष्णाला आलिंगण देण्यासाठी तीने आपले अनेक हात पुढे केले होते. असेच यमुनेवर आलेल्या अनेक तरंगाकडे पाहताना वाटत होते. "की आलंगावेया श्रीकृष्णराजा । तिया बहुति केलिया भुजा । तैसे तरंग पढियासले मज । कालिंद्रियेचे ॥ (अशी सुंदर उत्प्रेक्षा साधून कवीने सौंदर्य निर्मीती केली आहे.) यमुना नदी श्रीकृष्णाच्या प्रेमामुळे स्वत:चे देहभान विसरली. श्रीकृष्ण पाहताच तिच्या मनात जो आनंद निर्माण झाला. त्या आनंद सागराशी यमुना एकरूप झाल्यामूळे निश्चल दिसत होती. कवीने यमुनेचे वर्णन करताना एक सुंदर कल्पना वापरली आहे. ही कालींदी नव्हेच तर देवाच्या चरणापासून जन्मलेली मंदाकिनीच (गंगा) होय. श्रीकृष्णाच्या भेटीसाठी ही मंदाकीनी अगदी उतावीळ झाली आहे. अशा प्रकारची अपन्हुती अलंकाराची कवीने निर्मीती केली आहे. किंवर ही यमुना नसून पाताळातील भोगावती नदीच आहे. की, काय असे वाटत होते. पाताळात राहिल्यामुळे आपण अधोगतीला गेलो. आता कृष्णाच्या संगतीत आपली अधोगती नष्ट होईल. असे त्या यमुनेकडे पाहताना कवीला वाटते. ही यमुना अगोदरच पुराणामध्ये प्रसिध्द होती. त्यानंतर कृष्णाचा चरणस्पर्श झाल्यामूळे तिला सर्व तीर्थात सर्वश्रेष्ठ स्थान मिळाले. त्या यमुनेला चंद्रकांत मन्याचे घाट बांधले तीचे वाळवंट हि-यांनी खचून भरले. त्या वाळवंटात मोत्यांनी भरलेले शिंपले जागोजाग दिसत होते. यमुना सर्व वैभवानिशी संपन्न होती. श्रीकृष्णाचा सावळा रंग व त्या सावळ्या रंगाची इंद्रनिल ध्वनी जागोजाग विखुरलेले होते. यमुनेच्या पाण्याजवळ रत्नाच्या चुण्याची मऊ बारीक वाळू होती. यमुना नदी सागराची पत्नी आसल्यामुळे रत्नजडीत अलंकार, तीने आपल्या सातही अंगावर एकाचवेळी परिधान केले आहेत. असे वाटत होत किंवा यमुनेच्या प्रवाहात पाण्याच्या हेलकाव्यामुळे यमुनेतील कमळाची फुले वर खाली होत होती. जणू कांही ती यमुना नदी -श्रीकृष्णाला नऊ रत्नांची ओवाळणीच करीत होती. की, काय असे वाटत होते. अशा तऱ्हेने एकापेक्षा एक सुंदर कल्पना येऊन कवीने यमुनेचे वैभव वर्णन केले आहे. यमुनेच्या काठावर अनेक पक्षांचे समुह आपापल्या कामात गढून गेले होते. बगळे एका पायाच्या अंगठ्यावर उभे राहून जप तपश्चर्या करीत बसले आहेत. असे वाटत होते. ढोक हा पक्षी नाकाच्या टोकावर दृष्टी केंद्रित करून जणू कांही ध्यान करीतआहे असे वाटत होते. किंवा ठिकठिकाणी आपल्या सहचारिला घेऊन 'चक्रवाक' पक्षी विहार करित होते. यमुनेच्या काठावर जे राजहंस होते ते कांही एखादया योगी पुरुषाप्रमाणे प्रकृती आणि पुरुष यांचा निवाडा करीत होता. श्रीकृष्णाचा वेध लागल्यामुळे यमुनेच्या काठावरील जड वस्तु देखील चैतन्यशिल बनल्या होत्या. लता वृक्षांवर रोमांच निर्माण झाले होते. कृष्णाचा ध्वनी ऐकताच पशुसुद्धा चरण्याचे भान विसरून गेले. पाखरे कृष्णाच्या दृष्टीक्षेपाने, आनंदीत झाले. इतके घनदाट आकर्षण कृष्णाच्या रुपात होते. ज्याप्रमाणे मेघाने सूर्याचा प्रकाश झाकून टाकला म्हणजे सूर्यविकासी कमळाचा याप्रमाणे परमात्मा श्रीकृष्ण गोपवेषात आल्यामुळे गोपालनापासून गुप्त राहिला होता; परंतु असे असले, तरी श्रीकृष्णाचे आकर्षण सर्वांनाच वाटत होते. अशी सुंदर कल्पना कविने केली आहे. "मेघी झाकोललेया रविचा प्रकाशु । न धरे पदमिनिचा विकासु । तैसा गोपवेखे गुपित परेशु । पर वेध संचरतातिं" ॥१८५॥ अशा प्रकारचे आकर्षण, सौंदर्य स्थळे वच्छाहरणात यमुनेच्या वाळवंटावर सर्व प्राणी परस्परांचे वैर विसरून क्रिडा करीत होते. उंदिर-मांजराच्या मांडीवर बसले होते, घोडे आणि रेडे हे ऐकमेकाला आलिंगन देत होते. हत्ती सिंहासी खेळत होते, तर हरिण - वाघाला गोंजारत होती. सर्प - मोराच्या पिसा-याखाली विसावा घेत होते. अशा प्रकारे श्रीकृष्णाच्या प्रभावामुळे सर्व प्राणी आपले वैर विसरले होते. यमुनेतील जलचर श्रीकृष्णाचे अवलोकन करण्यासाठी पाण्याच्या पृष्ठभागावर येऊन श्रीकृष्णाची मुर्ती न्याहळत होती. श्रीकृष्णाचे अनेक रूपे पाण्यात प्रतिबिंबित झाले होते. तेंव्हा सर्व मासे आणि जलचर उतावळेपणाने त्या प्रतिबिंबालाच अलिंगन देत होते. थोडक्यात यमुना वर्णनात कवीचे श्रीकृष्ण प्रेम प्रत्येक शब्दाशब्दात स्त्रवत असते. खरे म्हणजे वच्छाहरणाची सर्व कथाच उत्कट भीकृष्ण भक्तिचा अविष्कार आहे. यमुनेच्या काठावर अनेक साधक साधना करित होते कुणी नित्य नैमित्तीक कर्मे करत होती ब्रम्हचारी,

अनेक गृहस्थी, संन्यासी आपापल्या आश्रमानुसार कर्मे करित होते; पण त्यापैकी एकालाही ईश्वरी तत्वाचे ज्ञान झाले नव्हते. वास्तवीक परमेश्वर त्यांच्या जवळच होता; पण कर्माच्या अभिमानामुळे त्यांना परमेश्वर दिसत नव्हता. आणि कृष्णही नव्हता असे वर्णन करून दामोदर पंडितानी भक्तिचे श्रेष्ठत्व प्रतिपादीत केले आहे. दामोदर पंडित आपल्या काव्यात कोणतेही रस, अलंकार केवळ रंजनासाठी आणीत नाहित; पण भक्तिरसाचा परिपोष साधण्यासाठी कवीने आपल्या काव्यात अनेक प्रकारचे कल्पनावैभव निर्माण केलेले आहे. (जसे वरील वृंदावन वर्णनात व यमुना वर्णनात कवीच्या कल्पनाशक्तितून निर्माण झालेली अनेक सोदर्य स्थळे आपण पाहिली. आहेतच याशिवाय या काव्यातील इतर वर्णनातही कवीचे कल्पना वैभव दिसून येते. त्या कल्पनावैभवात परमेश्वर तत्वाचे गुढचिंतन मिसळले आहे.) उदा. श्रीकृष्ण गोपाळासोबत वृंदावनात भोजनासाठी बसतात. त्याचे सुंदर चित्र कवीने रेखाटले आहे. सर्व गोपाळांनी वासरांना यमुनेचे पाणी पाजले आणि त्यांना हिरव्या कुरणात चारावयास सोडले. सर्वांच्या मध्यभागी श्रीकृष्ण बसला आणि सर्व गोपाळ आपआपल्या शिदोऱ्या घेऊन कृष्णाभोवती गोलाकार बसतात. जणुकाही श्रीकृष्णरूपी चंद्राजवळ गोपाळरूपी ता-यांच्या रांगाच आहेत की, काय असे वाटत होते. किंवा श्रीकृष्ण हा निळ्या आकाशाप्रमाणे तर गोपाळ हे त्या निळ्या आकाशात दाटून आलेल्या मेघांच्या समुदायाप्रमाणे दिसत होते. अतिशय सुंदर कल्पना वापरून श्रीकृष्ण व गोपाळ यांच्या प्रेमाचे स्वरूप वर्णन केलेले आहे. ज्याप्रमाणे ब्रम्हविदयेपुढे सर्व विद्या शरण येतात. त्याप्रमाणे सर्व गोपाळ कृष्णाला पाहण्यासाठी उत्सुक झालले आहेत. कृष्णाने आपल्या डाव्या हातावर दहिभाताचा घास घेतला होता व बोटाच्या सांदीत आवळा, बेल व आंब्याची लोणची भरलेली होती. सर्व गोपाळ थट्टामस्करी करत जेवत होते. जणू कांही कृष्णाने आपल्या हातावर, परमानंद घेतला होता आणि तोच आनंद तो गोपाळांना वाटत होता किंवा कृष्णाने आपल्या हातावर दहिभाताचा काला घेतला होता. असे नसून आपल्या हातावर त्याने ब्रम्हविदया घेतली होती आणि ती प्रभुविद्या उदार मनाने तो भक्तांना देत होता. अशा प्रकारचे तत्वचिंतन या वर्णनात आढळते. वनभोजनाच्या वेळी श्रीकृष्णाची मूर्ती किती अप्रतिम दिसत होती. दामोदर पंडितानी जवळपास २८ ओव्यात वर्णन केले आहे. मूळ भागवतात हे वर्णन फक्त एका श्लोकात आहे; पण कवीने आपल्या कल्पनाशक्तिने हे वर्णन अधिक विस्तृत केलेले आहे. ज्याप्रमाणे इंद्रनिल मन्याचे तेज आणि निळ्या कमळाची शोभा एकवटते. त्याप्रमाणे श्रीकृष्णाची सावळी मुर्ती शोभून दिसत होती. श्रीकृष्णाचे चरणकमल सुकुमार व आनंदाने रसरसित होते. म्हणूनच की, काय संतमुनीरुपी भ्रमर त्या कमलावर लुब्ध झाले होते. अशी सुंदर रूपरेशा कवीने साधली आहे. ज्याप्रमाणे परिसाच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने होते. त्याप्रमाणे कृष्णाच्या चरणस्पर्शाने पाणीदेखील पवित्र झाले होते. कृष्णाने परिधान केलेला पितांबर सोन्याच्या रंगाने रंगलेला होता. त्याच्या कमरेवर असलेला कंबरपट्टा छोट्या - छोटया घुंगरांनी रूणझुणत होता. जणू कांही श्रृती आणि वेद परब्रम्हाला पाहून 'नेतिनेति' असे म्हणत होत्या. की, काय असे वाटत होते. अशा तऱ्हेचे सुंदर तत्वचिंतन कवीच्या कल्पनाशक्तित व्यक्त होते. श्रीकृष्णाच्या लखकारी चंद्राच्या तेजाने योगीजनरूपी कमलांचा विकास होतो. त्यामुळे योग्यांच्या अंत:करणातील मिलिधताप नष्ट होतो. अशा प्रकारचे सुंदर रूपक वापरून कवीने कृष्णाच्या नखाचे सौंदर्य वर्णन केले आहे. श्रीकृष्णाने परिधान केलेला पितांबर आणि त्याने खादयांवर घेतलेला शेला जणू काही निळ्या आकाशात विज चमकून जावी त्याप्रमाणे तो शेला शोभून दिसत होता. अशा प्रकारचे काम कवीने केले आहे. कृष्णाने परिधान केलेल्या वैजयंती माळात जणू कांही एखादया सुंदर स्त्रीने गळ्यात हात घालून आलिंगन दयावे त्याप्रमाणे ती वैजयंती माला शोभत होती. एरवी श्रृंगार, विर इ. रसामध्ये उदासिनता दाखविणाऱ्या दामोदर पंडिताने किती श्रृंगारीक कल्पना विलास केला आहे. हे या उदाहरणावरुन दिसून येते. श्रीकृष्णाच्या मुखाचे सौंदर्य अलौकीक आणि सदैव टवटवीत व प्रसन्न होते. चंद्राला जर त्या मुखाचे सेवक होता आले असते, तर त्याला कलंक लागला नसता. असा सुंदर व्यतिरेक साधून कवीने श्रीकृष्णाचे मुखसौदर्य चंद्रापेक्षाही सुंदर आणि निष्कलंक केले आहे. असे वर्णन केले आहे. "कृष्ण श्रीमुखाचे बरवेपण । कैसे सदोदित सुप्रसन । ते याचे इंदू लाहाता पाइकेप । तरि कलंकिया नव्हता" ।।२३५।। श्रीकृष्णाचे सरळ व सुप्रसन्न डोळे सर्व त्रिभुवनाकडे पाहता आणि जणू कांही हितगुज सांगण्यासाठी कानापर्यंत जातात. अशी उत्पेक्षा योजून कवीने श्रीकृष्णाच्या आकर्षक नेत्राचे सौंदर्य कवीने वर्णन केलेले आहे. कृष्णाचे केस कुरूळे आणि काळे गुळगुळीत होते आणि ते केस हळूच

कपाळावर ओघळत असत. ते पाहून जणू कांही श्रीकृष्णाच्या मुखकमलाच्या सुगंधाने वेडे झालेले भ्रमरच आहे की, काय असे कुरूळ्या केसाकडे पाहून वाटत होते. ब्रम्हदेवाने वासरे आणि गोपाल यांचे हरण केले. आपल्या लिलेने जशीच्या तशी वासरे आणि जसेच्या तसे गोप निर्माण केली आणि त्या सर्वांना घेवून श्रीकृष्ण गोकूळात आला. त्याप्रसंगी कवी लिहितो की, एकच कृष्ण अनेक झाला होता. ज्याप्रमाणे एखादया मण्यांच्या माळेत दोरा असावा किंवा आकाशात मेघांच्या रांगा असाव्यात किंवा एकाच चंद्राचे प्रतिबिंब हजारो घटात प्रतिबिंबित व्हावे. त्याप्रमाणे एकच एक कृष्ण अनेक वासरे आणि गोपाल रुपाने नटला होता. गोकुळातील बऱ्याच गाईच्या वासरांचा रंग काळा होता. कारण गाईंना ज्यावेळी गर्भधारणा होत असते. त्यावेळी त्या गाई मनाने कृष्णाचे चिंतन करत होत्या. म्हणून कृष्णाचा काळा रंग वासरांना मीळाला होता असे वर्णन करून गाई वासरासारखे मुक्या प्राण्यांचे श्रीकृष्णप्रेम कवीने वर्णन केले आहे. विविध वेषाने, आकाराने व रंगाने नटलेला श्रीकृष्ण गोकूळात नांदत होता. जणू कांही सर्व गोकुळात अनंदच आनंद निर्माण झाला होता. गोकूळाचे भव्य वर्णन करताना कवी लिहीतो. "जे याचे ति तुखारे जि जे । ते या अमृताचा सागरू पाविजे । परमाणु दुर्लभू मानिजे । तेयाचा मेरू जोड़े" ॥ २९१ ।। ज्या अमृताच्या एका थेंबाच्या तुषाराने माणूस जिवंत होतो किंवा ज्या सुखाचा परमाणू देखील मिळणे शक्य नाही. त्या सुखाचा मेरू पर्वत गोकूळाला लाभला होता. असे अतिशयोक्तीने वर्णन करून कवीने श्रीकृष्णाच्या विविध रूपात गोकूळात सर्वत्र कसा आनंद निर्माण झाला होता. ते चित्रित केले आहे. श्रीकृष्णाचे वासरांच्या रूपाने असलेले रूप पाहून गोकूळातील गाई इतके दुध देत होत्या की, जणू काही गोकूळात दुधाच्या नदया वाहू लागल्या. असे अतिशयोक्तीने वर्णन करून गोकूळातील समृध्दीचे चित्र कवीने रेखाटले आहे. एका सकाळी श्रीकृष्ण वासरांना घेवून बलराम आणि सवंगड्यासोबत गोवर्धन पर्वताच्या पायथ्याशी आला. त्याचवेळी गोवर्धन पर्वताच्या पठारावर गोकूळातील मोठे गोपाळ गाईंना चारत होते. तेवढ्यात कृष्णाने बासरी वाजविण्यास सुरुवात केली. बासरीचा आवाज ऐकून गाई चरायचे विसरल्या आणि कृष्णाच्या दिशेने पळत सुटल्या. त्या गाई कशा दिसत होत्या याचे वर्णन करताना कवी लिहितो “ त्या उधळलेल्या गाई म्हणजे स्नेहरुपी दुधाने भरलेल्या नदया, श्रीकृष्णरूपी आनंदसमुद्रास मीळत होत्या. असे वाटत होते वासरांना पाहून गाई वासरांना चाटू लागल्या. ज्याप्रमाणे योगीपुरुष आपल्या हृदयात सर्व इंद्रीयांच्या द्वारा ईश्वराची मुर्ती स्थापन करतात. त्याप्रमाणे त्या गाई वासरांना पाहून आपल्या हृदयात त्या वासरांच्या मुर्ती स्थापन करीत होत्या. असेच वाटत होते. मुक्या प्राण्यांच्या प्रेमात दामोदर पंडितांना श्रीकृष्ण दिसत असत. ब्रम्हदेवाने आपला गर्वपरिहार झाल्यानंतर श्रीकृष्णाची स्तुती केली. त्याप्रसंगी ब्रम्हदेवाच्या तोंडी कवीने उत्कट शरणागतीचा भाव घातला आहे. ब्रम्हदेव म्हणतो "हे श्रीकृष्णा तुझ्या भक्तिचा मार्ग ज्यांना मिळाला नाही ते सर्व जीव संसाररूपी अरण्यात वाटा चुकले आहेत. कारण संसार हे एक घनघोर अरण्य आहे. या संसारात कर्मरूपी झाडे बहरतात त्यांना सुखदु:खरूपी फळे लागतात आणि त्या फळांचे सेवन करण्यात जीव परमेश्वर भक्तिला विसरून जातो. हा संसार म्हणजे अनेक पदार्थाच्या आसक्तिच्या वेलींनी आणि दाट झाडीने गर्द झाला आहे. विषयरूपी गवतामूळे कुठेही मार्ग दिसत नाही. तरिही पण इंद्रियरूपी कीरणे या गवतांच्या कुरणात स्वैर विहार करतात. या संसाररूपी अरण्यात अहंकाररूपी हत्ती माजले आहेत. मत्स्यरूपी रेडे, मोहरूपी वाघ आणि अविदयारूपी राक्षस स्वैर विहार करतात. या संसारात आपल्या सामर्थ्याने जगाला मोहीत करणारा मदन लपून बसला आहे. या अरण्यात क्रोधरूपी सिंह, धर्मकापी हत्तीला भिती दाखवितो, तसेच या संसाररूपी अरण्यात गर्व आणि अभिमान यांचे पर्वत असून कृष्णा आणि ममता यांच्या द-या आहेत. या संसारातील सुंदर स्त्रिया काळ सर्पिणीप्रमाणे आपल्या डोळ्यांच्या कटाक्षाने दंश करतात. या अरण्यात अज्ञाताचा अंधार आहे. त्यामुळे ज्ञानरूपी सुर्याचा प्रकाश पसरू शकत नाही. म्हणूनच या संसारातील जिवरुपी प्राणी मोक्षाची दिशा चुकले आहेत. अशा प्रकारचे सुंदर रूपक योजून कवीने संसाररूपी अरण्याचे भयभित करणारे वर्णन लिहिले आहे. थोडक्यात दामोदर पंडित यांचा कल्पनाविलास अभिजात संस्कृत काव्यासारखा आहे. अनेक अलंकार योजून कवीने वच्छाहरणात अनेक प्रसंगाचे चित्रण केले आहे. महानुभाव पंथात कृष्ण कथेवर काव्य लिहिणारे नरेंद्र पंडित, भास्कर भट्ट बोरीकर, कवी आहेत. पण कृष्णकथेत भक्तिरसाला महत्त्व देणारा दामोदर पंडित हा एकमेव कवी आहे. नरेंद्र पंडिताचे रुक्मिणीस्वयंवर शृंगारीक आहे. संस्कृत काव्याच्या अनुकरणातून नरेंद्राने

अनेक सुंदर-सुंदर कल्पना आपल्या काव्यात आणल्या आहेत. भास्करभट्ट बोरीकर यांचा 'शिशुपालवध' हा ग्रंथही श्रृंगार काव्याचा उत्कृष्ट नमुना आहे. महदंबेचे धवळे लोकगीताच्या धर्तीवर गाईले असून त्यात भक्तिपेक्षा स्त्रिसुलभ भावना व्यक्त झाल्या आहेत. या तुलनेत दामोदर पंडितांचे वच्छाहरण हे काव्य भक्तिरसाने ओतप्रोत झालेले आहे. अनेक वर्णनांची परिणीती भक्तिरसात कशी होते. हे पुढील उदाहरणावरून सष्ट होईल. उदा. वच्छाहरणातील यमुनावर्णन हे एक सुंदर निसर्गवर्णन आहे. पण त्या वर्णनाबरोबरच कवीने भक्तिरसाला तितकेच महत्व दिले आहे. श्रीकृष्णामूळे जड निसर्गालाही चैतन्य प्राप्त झाले आहे. यमुना काळी का तर तिच्यात कृष्णाच्या सावळया रंगाचे प्रतिबिंब निर्माण झाले होते. कृष्णाला पाहून यमुना संगमीत झाली. तीचे अंत:करण प्रेमाने दाटून आले. जणू कांही श्रीकृष्णाला आलींगन देण्यासाठी तीने आपले असंख्य बाहू पसरले असेच वाटत होते. कृष्णाचा वेध लागताच यमुना देहभान विसरली. यमुनाच काय यमुनेच्या काठी असलेले हंस, ढोक,चक्रवाक इ. पक्ष्यांनाही कृष्णाचा वेध लागला होता. झाडे वेली, पशू-पक्षी सर्वांनाच कृष्णाच्या प्रेमाने वेडे केले होते. अशा शब्दात कवीने श्रीकृष्णप्रेमाचे चित्र रेखाटून भक्तिरस निर्माण केला आहे. कृष्णाने आपल्या विज्ञानशक्तीने अधासुराचा वध केला आणि त्यास मुक्त केले. हे पाहून स्वर्गातील देवांना अतिशय आश्चर्य वाटले आणि सर्व देव कृष्णाचे चरित्र गाऊ लागले. या कृष्णाच्या सानिध्यात चराचराचा उध्दार झाला आहे. खरे म्हणजे अधासूर वैर भावनेने कृष्णाकडे आला; पण तरीही कृष्णाने त्यास मुक्ती दिली. मग भक्तांना हा श्रीकृष्ण काय देईल हे श्रीकृष्णालाच माहित. "सनिधी मुक्ती उध्दरीली तृणचे । एके मुक्ती पावविली वैरे । भगता काई दिधले उदारे । ते श्रीकृष्णुचि जाणे।।१२१।।" जे श्रीकृष्णाच्या जवळ असतात त्यांना मग ते क्रुमीकिटक असले तरीपण त्यांना कृष्णाने ब्रम्हसुख दिले. जे सुख सनकादिकांनाही दुर्लभ आहे. अशा शब्दांत देवांनी वृंदावनातील भक्तिसुखाचे वर्णन करून एक प्रकारे हेवा व्यक्त केला आहे. अधासूर वधाचा प्रसंग खरे म्हणजे अद्भूत रसाला प्राप्त करून देणारा होता. पण या प्रसंगात कवीने भकतवत्सल कृष्णाचे रूप चित्रित केले आहे. अधासुराने सर्व वासरे आणि गोपाळ गिळून टाकले. हे जेंव्हा श्रीकृष्णाने पाहिले तेंव्हा आता आपण काय करावे असा प्रश्न त्यांच्यासमोर निर्माण झाला. त्याला आपण लाथाबुक्क्या मारून मारले तर त्याच्या पोटातील गाई वासरे व गोपाळ मरून जातील. म्हणून भक्तांचा उध्दार करण्यासाठी संसारात अवतार धारण करणा-या श्रीकृषणाने त्या सापाच्या मुखात शिरून गोपाळांचे रक्षण केले. भक्तांचे रक्षण करणे हे त्याचे ब्रिदच आहे. म्हणूनच उत्तरेने संकटप्रसंगी श्रीकृष्णाचे स्मरण केले आणि त्या चक्रधराने आपल्या सुदर्शन चक्राने उत्तरेच्या गर्भातील परिक्षिताचे रक्षण केले. पांडवांना जाळण्यासाठी कौरवांनी त्यांना लक्षागृहात जाळून मारण्याचे कारस्थान केले पण कृष्णानेच त्या संकटापासून पांडवांचे रक्षण केले. पांडव वनात असताना एकदा दुर्वास ऋषी पांडवांची सत्वपरीक्षा पाहण्यासाठी आले. पण त्याही वेळी द्रौपदीने धावा केला आणि दुर्वास ऋषींच्या संकटातून पांडवांचे रक्षण केले. असा तो भक्तांचा कैवारी आणि पिडीतांचा रक्षणकर्ता श्रीकृष्ण त्या सापाच्या मुखात शिरला असे वर्णन करून भक्तवत्सल देवाचे रूप कवी चित्रित करतो. गोकूळातील लोकांचे भाग्य आहे की हे सावळे परब्रम्ह मानवी रूपात गोकूळातील घराघरात खेळत होते. त्या भाग्याचे वर्णन करताना कवी लिहितो. "धन्ये धन्ये ते गोकूळ। जेथ परदैव रांगेत । बाल डोलस । आंगे वेल्हाळ गोपी परिये देताती" ।।६४।। ज्या देवाचे वर्णन वेदपुराणे करतात ज्या देवाने ही सर्व भुवने निर्माण केली. ज्या परमात्म्याला गवळणी लोणी देतात. आणि देवसुध्दा लोण्यासाठी हट्ट करतो. जो देव त्रैलोक्याचा स्वामी आहे. तो देव नंदाचा मुलगा होऊन वासरे राखण करतो अशा शब्दात कवीने वर्णन करून भक्तिरसाची निर्मिती साधली आहे. श्रीकृष्णाच्या कथेत नऊ रस आहेत. म्हणूनच ज्या ज्या कवींना नऊरसाची निर्मिती करायची आहे. त्यांना श्रीकृष्णकथेसारखे दुसरे स्थान आहे. कारण श्रीकृरूणाच्या रासक्रिडेत शृंगाररस आहे. श्रीकृष्णाच्या खोडयात हास्यरस आहे. श्रीकृष्णाने यशोदेला भक्ति दाखवीली त्यात करूणरस आहे. कृष्णाने कालीयासर्पाला जिंकले त्या प्रसंगात रौद्ररस आहे. तसेच कृष्णाने आपल्या तोंडात यशोदेला विश्वरूप दाखविले. त्यात अद्भूत व भयानक रस आहे. तर श्रीकृष्णाने वेळोवेळी दैत्यांचा संहार केला. त्या प्रसंगात बिभत्स रस आहे. आणि विर रस आहे अशा त-हेने भगवान श्रीकृष्ण जगाला मोहीत करणारे नवरसात्मक खेळत आहे. असे वर्णन करून कवीने येथेही भक्तिरस निर्माण केला आहे. श्रीकृष्णाने बालकांची रूपं धारण केली. आणि त्या रूपात प्रत्यक्ष परब्रम्ह तर पुसत

गोकुळवासीयांकडे आले. आतापर्यंत कृष्ण यशोदेच्या घरी होता; पण आता मात्र प्रत्येक गवळयाच्या घरात परमानंद प्रगट झाला होता. संसारातील सर्व सुखाचा त्याग करून योगी ज्यांचे चिंतन करतात. त्या परमात्म्यास पुत्रभावाने गवळणी आलिंगन देत होत्या. शेषास हजार तोंडानी ज्या देवाची स्तुती करता येणार नाही. तो देव गोकूळाच्या प्रत्येक घराघरात जेवत होता. हट्ट करीत होता. जो देव मुळातच ब्रम्हरसाने युक्त आहे. तो देव गोकूळातील ताक, लोणी, दुध पिऊन ढेकर देत होता. असे वर्णन करून कवीने भक्तिरसाची निर्मिती साधली आहे.

थोडक्यात वच्छाहरणातील अनेक प्रसंगात कवीने भक्तिरस निर्माण केला आहे. ब्रम्हदेवालाही श्रीकृष्णांची महती कळाली नाही. म्हणूनच त्याने गोपवासरांचे हरण करून श्रीकृष्णाची परीक्षा पाहिली. पण त्या परीक्षेत ब्रम्हदेवच हरला आणि त्याने श्रीकृष्णाची स्तुती केली. तो श्रीकृष्णास शरण आला. तो श्रीकृष्णास म्हणाला हे श्रीकृष्णा सूर्याच्या प्रकाशापुढे काजव्याचे चमकही व्यर्थ आहे. त्याप्रमाणे तूझ्यापूढे माझी बुध्दि व्यर्थ आहे. तू शरणागतास अभय देतोस म्हणून मी तुला शरण आलो आहे. माझे अपराध क्षमा कर. अशा शब्दांत ब्रम्हदेवाने कृष्णाची स्तुती केली. त्यातूनही कवीने भक्तिभाव वर्णन केला आहे. अशा त-हेने वच्छाहरणातील अनेक प्रसंगात भक्तिरस फुलवला आहे.

**संदर्भग्रंथ :-**

1) (संपा.) वि. भि. कोलते, ‘वच्छाहरण’, इ.स. 1953
2) शिवाजी गऊळकर, ‘प्राचीन मराठी आख्यानकविता : उद्गम आणि विकास’, निर्मल प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती, 2000
3) अ.ना.देशपांडे, ‘प्राचीन मराठी वाड्.मयाचा इतिहास’, (भाग पहिला) व्हीनस प्रकाशन पुणे, द्वितीय आवृत्ती, 1995
4) प्र. न. जोशी, ‘प्राचीन मराठी वाड्.मयाचा विवेचक इतिहास,' प्रसाद प्रकाशन पुणे, द्वितीयावृत्ती, 1978
5) ल.रा.नसिराबादकर, ‘प्राचीन मराठी वाड्.मयाचा इतिहास’, फडके प्रकाशन कोल्हापूर, सहावी आवृत्ती, 1997
6) डॉ. यशवंत साधू, यांनी केलेले मार्गदर्शन, इ.स. 2000